# NSS Activity 2022-23

| | |
|---|---|
| **Event Title** | **“ बेरोजगारी एक समस्या या विषयावर व्याख्यान ‘’** |
| **Organized BY** | राष्ट्रीय सेवा योजना विभाग व वाणिज्य विभाग |
| **Date of Organization** | २२ डिसेंबर २०२२ |
| **Funding Agency** | - |
| **Collaboration /MOU** | - |
| **Description** | २२ डिसेंबर २०२२ रोजी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व वाणिज्य विभागाच्या वतीने **“ बेरोजगारी एक समस्या या विषयावर व्याख्यान ‘’** संपन्न या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे युथ एम्पॅरमेंट चे अध्यक्ष निंगराज विंचुरे होते व अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.सुरेश भोसले होते. |
| **Photographs** |  |

## सांगोला महाविद्यालयामध्ये ‘बेरोजगारी एक समस्या’ या विषयावर व्याख्यान संपन्न

**सांगोला/प्रतिनिधी:**

महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि वाणिज्य विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने ‘बेरोजगारी एक समस्या’ या विषयावर बुधवार दिनांक २२ डिसेंबर २०२२ रोजी व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे युथ एम्पॉवरमेंट चे अध्यक्ष माननीय श्री.निंगराज विंचुरे सर होते. सरांनी आपल्या मार्गदर्शनात विद्यार्थ्यांनी आपले ध्येय सर्वप्रथम सुनिश्चित केले पाहिजे व ध्येय गाठण्यासाठी विद्यार्थ्यांच्या अंगी जिद्द, चिकाटी, मेहनत, आत्मविश्वास, समर्पण आणि सातत्य हे गुण महत्त्वाचे आहेत तसेच विद्यार्थ्यांनी स्मार्ट वर्क ला प्राधान्य दिले पाहिजे व आपले ध्येय गाठले पाहिजे असा यशाचा मार्ग सांगितला व आजचा जमाना डिजिटल असून मोबाईलचा विद्यार्थ्यांनी योग्य असा वापर केला पाहिजे हे पटवून दिले. त्यांनी आपण जीवनात कसा संघर्ष केला व कसे घडलो हे सांगितले व त्यांचा जीवन प्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला.या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. सुरेश भोसले होते त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणामध्ये विविध यशस्वी उद्योजकांची उदाहरणे व त्यांचा संघर्ष विद्यार्थ्यांसमोर मांडून बहुमोल असं मार्गदर्शन केले. या कार्यक्रमास शंकर स्वामी सर व सौरभ ठेंगणे सर तसेच वाणिज्य विभागप्रमुख सौ. प्रा.डॉ. विद्या जाधव मॅडम, प्रा.सौ.विद्या पटणे, प्रा समाधान माने व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख व राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.डॉ.बबन गायकवाड यांनी केले. तर आभार राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा.सचिन सुरवसे यांनी केले व सूत्रसंचालन विद्यार्थी सतीश मेटकरी यांनी केले.

**सकाळ**

## सांगोला महाविद्यालयात बेरोजगारीवर मार्गदर्शन

**महूद :** सांगोला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि वाणिज्य विभाग यांच्या वतीने बेरोजगारी एक समस्या या विषयावर नुकतेच व्याख्यान झाले.युथ एम्पॉवरमेंट चे अध्यक्ष निंगराज विंचुरे यांनी मार्गदर्शन केले. निंगराज विंचुरे यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांनी आपले ध्येय सर्वप्रथम निश्चित केले पाहिजे.हे ध्येय गाठण्यासाठी अंगी जिद्द, चिकाटी, मेहनत, आत्मविश्वास,समर्पण आणि सातत्य हे गुण महत्त्वाचे आहेत. विद्यार्थ्यांनी स्मार्ट वर्क ला प्राधान्य दिले पाहिजे. हा यशाचा मार्ग सांगितला. आजचा जमाना डिजिटल असून मोबाईलचा विद्यार्थ्यांनी योग्य वापर केला पाहिजे हे पटवून दिले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ.सुरेश भोसले होते. त्यांनी विविध यशस्वी उद्योजकांची उदाहरणे व त्यांचा संघर्ष विद्यार्थ्यांसमोर मांडला. कार्यक्रमास शंकर स्वामी,सौरभ ठेंगणे,वाणिज्य विभागप्रमुख प्रा. डॉ. विद्या जाधव, प्रा. विद्या पटणे, प्रा. समाधान माने यांचेसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ.बबन गायकवाड यांनी केले. सूत्रसंचालन विद्यार्थी सतीश मेटकरी याने केले तर आभार प्रा. सचिन सुरवसे यांनी मानले.